ePaper
# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे विरुद्ध बाळासाहेबांची शिवसेना!

| वर्ष - 6 | अंक - 179 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार | दिनांक11 ऑक्टोबर2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



### आतील पानांत

- महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आकर्षक फुलांची सजावट
- बेकायदा फ्लेक्स काढाच !
- वैभवशाली शहराला आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्वव्यापी स्मार्ट सिटी बनवण्याचा ध्यास


## राष्ट्रवादीच्या ‘संवाद सोसायटी’तील प्रस्तावांना प्रशासनाकडून कानाडोळा

# केराची टोपली?

### विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या सूचनांकडे दुर्लक्ष, बैठकीनंतर त्याच दिवशी कचरा व्यवस्थापनाचे आयुक्तांचे आवाहन

**। पिंपरी-चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

सोसायट्यांमध्ये निर्माण होणाऱ्या ओला कचऱ्याची विल्हेवाट महापालिका प्रशासनाने करावी, अशी सूचना वजा आदेश राज्याचे दस्तुरखुद्द विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी दिले होते. त्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका भवनात प्रशासक व आयुक्त शेखर सिंह यांच्यासह प्रमुख अधिकाऱ्यांची ‘सरप्राईझ मिटिंग’ घेण्यात आली. असे असतानाही आयुक्तांनी कायद्यावर बोट ठेवत सोसायटीधारकांनी ओला कचरा सोसायटींतच जिरवण्याचे निर्देश सोसायटीधारकांच्या कार्यशाळेत दिले. त्यामुळे ओला कचरा विल्हेवाट लावण्याची टांगती तलवार अद्याप पिंपरी-चिंचवडकरांवर कायम आहे.

महापालिका निवडणुकीत सोसायटीधारकांच्या समस्या कळीचा मुद्दा ठरणार...ही बाब लक्षात आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून ‘संवाद सोसायटीधारकांशी’ हा उपक्रम हाती घेण्यात आला. या उपक्रमाद्वारे राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी थेरगाव येथील कार्यक्रमात सोसायटीधारकांच्या समस्या जाणून घेतल्या.

त्या समस्यांचा प्रस्ताव तयार करुन थेट महापालिकेत धडक दिली. पिंपरी-चिंचवड महापालिकेत अचानक दौरा करुन प्रशासक व आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्याबाबत मागण्यांचा समविस्तर प्रस्ताव दिली. विशेष म्हणजे, “सोसायटीधारक कर भरतात मग आपण कचरा का उचलत नाही?” असा सवालही उपस्थित केला.

दरम्यान, ज्या दिवशी अजित पवार महापालिकेत बैठक घेवून सूचना देवून गेले. त्याच दिवशी दुपारी पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले रंगमंदिर येथे सोसायटीधारकांनी कचऱ्याची विल्हेवाट कशी लावावी? याबाबत कार्यशाळा घेण्यात आली होती. या बैठकीत शेखर सिंह यांनी प्रशासनाची भूमिका मांडली. शेखर सिंह म्हणाले की, शहरातील ज्या ग्रहनिर्माण संस्था, हॉटेल्स, रेस्टॉरंट, कंपन्या किंवा इतर आस्थापनांमध्ये प्रतिदिन १०० किलो आणि त्यापेक्षा अधिक कचरा निर्माण होतो, अशा अस्थापनांनी कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करावे. आयुक्त शेखर सिंह यांनी कायद्यावरच बोट ठेवल्यामुळे अजित पवार यांच्या मागणीला आता ‘बगल’ मिळाली आहे.





> वास्तविक, नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी अधिनियम २०१६ मध्ये लागू झाला. त्यानंतर २०१९ पासून महाविकास आघाडीच्या माध्यमातून अडीच वर्षे सत्तेत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला किंवा तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सोसायटीधारकांचा प्रश्न सोडवण्याची आठवण झाली नाही. आता निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादीला सोसायटीधारकांच्या हिताचा विचार आला आहे. केवळ राजकीय फायद्यासाठी हा केविलवाना प्रयत्न आहे. राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांचे अपयश आहे. त्याला अजित पवार स्वत: दुजोरा देत आहेत. - **एकनाथ पवार, प्रदेश प्रवक्ता, भाजपा.**

### कायदा काय सांगतो...?

नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी अधिनियम २०१६ अन्वये प्रतिदिन १०० किलो कचरा निर्माण होणाऱ्या आस्थापनेत ओल्या कचऱ्याचे कम्पोस्टिंग करणे बंधनकारक आहे. यामध्ये गृहनिर्माण संस्था, हॉटेल्स, रेस्टॉरंट, कंपन्या किंवा इतर आस्थापनांचा समावेश आहे.

### अचानक बैठक अन् सोसायटीधारकांचा संताप...

विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी महापालिकेत अचानक बैठक घेतली. त्यामुळे प्रशासनाची चांगलीच धावपळ झाली. याच वेळेत सोसायटीधारकांसाठी कचरा प्रश्नाबाबत कार्यशाळा नियोजित होती. मात्र, पवार यांच्या बैठकीमुळे आयुक्त आणि संबंधित विभागाचे अधिकारी कार्यशाळेला उशीरा पोहोचले. परिणामी, काही सोसायटीधारक ताटकळून निघून गेले. तर काहींनी प्रशासनाच्या नियोजनाबाबत संताप व्यक्त केला. त्यामुळे बैठका आणि कार्यशाळांचे फार्स करुन सोसायटीधारक पिंपरी-चिंचवडकरांना काय मिळाले? हा प्रश्न अनुत्तरित राहीला आहे.

---

# सेवा विकास बँकेचा परवाना अखेर रद्द

## रिझर्व्ह बँकेची कारवाई : आर्थिक अनियमिततेमुळे बँक बुडाली

**। पिंपरी ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरीतील नामांकित असलेल्या दि. सेवा विकास को ऑपरेटिव्ह बँकेचा परवाना अखेर रद्द करण्यात आला आहे. याबाबतचे आदेश भारतीय रिझर्व्ह बँकेने आज (दि.१०) दिले आहेत. राजकीय वर्चस्व वाद आणि आर्थिक अनियमिततेमुळे बँक अडचणीत आली होती.

पिंपरीतील मोठी बँक म्हणून सेवा विकास बँकेची ओळख होती. पिंपरी बाजारातील व्यापारी वर्गाची बँक असे देखील संबोधले जात होते. मात्र गेल्या काही वर्षापासून बँक वर्चस्वाच्या वादात अडकली होती. बँकेतील आर्थिक घोटाळ्याचे प्रकरण सुरू असताना आता बँकेचा परवाना आरबीआयने रद्द केला आहे.

आरबीआयने प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, बँकेकडे पुरेसे भांडवल आणि उत्पन्नाची क्षमता राहिली नाही. त्यामुळे बँकिंग नियमन कायदा १९४९ च्या अनेक तरतुदींचे पालन बँक करू



शकली नाही. बँकेची सध्याची आर्थिक स्थिती ठेवीदारांचे पैसे देऊ शकणारी नाही. बँकेला बँकिंग व्यवसाय चालू ठेवण्याची परवानगी दिल्यास सार्वजनिक हितावर प्रतिकूल परिणाम होईल. परवाना रद्द केल्यामुळे बँकिंग नियमन कायदा १९४९ अन्वये बँकेला ठेवी स्वीकारणे आणि ठेवींची परतफेड करणे यांचा समावेश असलेल्या ‘बँकिंग’चा व्यवसाय करण्यास मनाई करण्यात आली आहे.

### ठेवीदारांना दिलासा देण्याचा प्रयत्न...

**बँकेमध्ये रक्कम अडकून पडलेल्या ठेवीदार, खातेदारांना आता ठेवी विमा महामंडळाच्या योजनेनुसार (डीआयसीजीसी) रुपये पाच लाखांपर्यंतच्या आर्थिक मर्यादेपर्यंतच्या ठेवींच्या ठेव विमा दाव्याची रक्कम प्राप्त करण्याचा अधिकार आहे. बँकेच्या संबंधित ठेवीदारांकडून प्राप्त झालेल्या रक्कम मिळण्याच्या अर्जावर विमा उतरविलेल्या ठेवीपैकी १४ सप्टेंबर २०२२ अखेर १५२ कोटी ३६ लाख रुपयांच्या ठेवींची रक्कम यापूर्वीच संबंधितांना सर्व पूर्तता करुन देण्यात आल्याचे पत्रात म्हटले आहे.**

# महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आकर्षक फुलांची सजावट



पिंपरी : पिंपनी-चिंचवड महापालिकेच्या स्थापना दिनानिमित्त महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे. वर्धापन दिनानिमित्त शहरात विविध कार्यक्रम आणि उपक्रमांची रेलचेल सुरू आहे.

# पुणे जिल्ह्यातील १ हजार शाळा बंदच्या हालचाली!

।पुणे। महाईन्यूज ।

पुणे जिल्ह्यातील किमान २० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांवर राज्य सरकारची वक्रदृष्टी पडली आहे. राज्याच्या ग्रामविकास विभागाने अशा शाळांची माहिती जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून मागविली आहे. या सर्व शाळा बंद करण्याच्या हालचाली राज्य सरकारने सुरु केल्या आहेत. या शाळा बंदचा निर्णय झाल्यास, पुणे जिल्ह्यातील १४ हजार ८६५ विद्यार्थ्यांना त्यांच्या मूळ शाळांना मुकावे लागणार आहे. या विद्यार्थांच्या जवळच्या अन्य शाळांमध्ये समायोजन केले जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यामुळे जिल्ह्यातील दोन हजारांहून अधिक प्राथमिक शिक्षक हे अतिरिक्त ठरण्याचा धोका निर्माण झाला आहे.



राज्य सरकारच्या या मागणीनुसार पुणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडून करण्यात आलेल्या पाहणीत जिल्ह्यातील एक हजार ५४ प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या ही २० पेक्षा कमी असल्याचे आढळून आले आहे. या सर्व शाळा द्विशिक्षकी असल्याने, या शाळा बंद झाल्यास एकूण २ हजार १०९ प्राथमिक शिक्षक हे अतिरिक्त ठरणार आहेत. शिवाय पुणे जिल्ह्यातील झेडपीच्या शाळांची संख्या ही कमी होऊन ती २ हजार ६८५ इतकी होणार आहे. सद्यःस्थितीत जिल्ह्यात झेडपीच्या एकूण ३ हजार ७३९ शाळा कार्यरत आहेत. दरम्यान, केंद्र सरकारने २००९ मध्ये मंजूर केलेल्या आणि राज्यात २०१० पासून अंमलबजावणी सुरु झालेल्या बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण कायद्यातील तरतुदीचा या शाळा बंद करण्यास अडसर निर्माण होणार आहे. या कायद्यातील तरतुदीनुसार किमान २० पर्यंत विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांवर किमान एक शिक्षक नियुक्त करण्याची तरतूद आहे.

या तरतुदीनुसार राज्य सरकार पटसंख्येच्या प्रमाणानुसार शिक्षकांना अतिरिक्त ठरवू शकते. परंतु शाळा बंद करू शकत नसल्याचे मत शिक्षण विभागातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर व्यक्त केले आहे.

**"जिल्ह्यातील वीसपेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या शाळा बंद करण्याच्या धोरणामुळे ग्रामीण भागातील शालाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या वाढण्याचा धोका आहे. यामध्ये मुलींचे प्रमाण अधिक असणार आहे. कारण मुली आपापल्या गावापासून दोन ते तीन किलोमीटर अंतरावरील शाळेत प्रवासाची सोय उपलब्ध नसल्याने जाऊ शकत नाहीत. तसेच या मुलींच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोण घेणार, हा प्रश्न आहे.**

**- सुप्रिया आगवणे-कणसे, शिक्षिका, रेडणी, ता. इंदापूर.**

**"जिल्हा परिषदेने कोणताही शाळा बंद करण्याचा निर्णय घेतलेला नाही. केवळ राज्य सरकारने याबाबतची माहिती जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून मागविली होती. यानुसार या शाळांची तालुकानिहाय संख्या निश्चित करून, त्याबाबतची माहिती राज्य सरकारला पाठविली आहे.**

**- संध्या गायकवाड, जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक).**

### वीसपेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांची स्थिती

पाचपेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या शाळा -- १६१ (८०५ विद्यार्थी)
पाचपेक्षा जास्त, पण दहापेक्षा कमी -- २१३ (२ हजार १३०)
दहाहून अधिक, पण पंधराहून कमी -- ३३४ ( ५ हजार १०)
पंधरापेक्षा अधिक आणि वीसच्या आत -- ३४६ (६ हजार ९२०)
२० पेक्षा कमी विद्यार्थ्यांच्या एकूण शाळा -- १ हजार ५४ (१४ हजार ८६५)
यामुळे अतिरिक्त ठरणारे शिक्षक --- २ हजार १०८

### वीस विद्यार्थ्यांच्या आतील तालुकानिहाय शाळा

| | |
|---|---|
| आंबेगाव --- ९६ | खेड --- १२८ |
| बारामती --- ३९ | मावळ --- ८८ |
| भोर --- १४३ | मुळशी --- ११९ |
| दौंड --- ३८ | पुरंदर --- ६६ |
| हवेली --- २१ | शिरूर --- ८४ |
| इंदापूर --- ५३ | वेल्हे --- ९४ |
| जुन्नर --- ८५ | |

# बेकायदा फ्लेक्स काढाच !

## जनसंवाद सभेत नागरिकांच्या तक्रारी : प्रशासनाने तात्काळ कारवाई करण्याची मागणी

**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**नागरिकांच्या सोयीसाठी विविध ठिकाणी नव्याने पीएमपीएमएलचे बस स्थानक उभारण्यात यावेत. विद्युत खांबांवर अनधिकृतपणे लावण्यात आलेले फ्लेक्स वा-यामुळे उडून नागरिकांवर पडत असून त्यामुळे जीवितास धोका निर्माण झाला आहे. असे फ्लेक्स तातडीने काढावेत, अनधिकृतपणे फ्लेक्स लावणाऱ्यांवर कारवाई करावी, अशा तक्रारवजा सूचना नागरिकांनी जनसंवाद सभेत मांडल्या.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने नागरिकांच्या आशा आणि आकांक्षांचे प्रतिबिंब महापालिकेच्या ध्येय धोरणे, विविध निर्णयात दिसावे तसेच शहरातील नागरिक आणि प्रशासन यांच्यामध्ये सुसंवाद राखण्यासाठी तसेच तक्रारींचे निवारण जलदगतीने करण्यासाठी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आज जनसंवाद सभा पार पडली. आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत ५४ नागरिकांनी सहभाग घेऊन तक्रारवजा सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयामध्ये अनुक्रमे १६, ४, ३, ६, ४, १, ८ आणि १२ इतक्या नागरिकांनी उपस्थित राहून आपले म्हणणे मांडले.

अ, ब, क, ड, ई, फ, ग, ह, या क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे अध्यक्षपद मुख्य समन्वय अधिकारी असलेले अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता श्रीकांत सवणे, सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे, उप आयुक्त चंद्रकांत इंदलकर, आरोग्य विभागाचे उप आयुक्त अजय चारठाणकर, सहायक आयुक्त प्रशांत जोशी, यांनी भूषवले. तसेच आठही क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी, सुचिता पानसरे, सोनम देशमुख, अण्णा बोदडे, उमाकांत गायकवाड, राजेश आगळे, सीताराम बहुरे, शीतल वाकडे, विजयकुमार थोरात हे उपस्थित होते. क्षेत्रीय कार्यालयातील जनसंवाद सभेत स्थापत्य, जलनिस्सारण, पाणीपुरवठा, विद्युत, नगररचना विभागांचे कार्यकारी अभियंता, उद्यान, वैद्यकीय, आरोग्य, करसंकलन या विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करा...

आज झालेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी विविध तक्रारी व सूचना मांडल्या. शहरात ठिकठिकाणी आरोग्य विभागाच्या वतीने धूर फवारणी करण्यात यावी, जलवाहिन्यांचे अर्धवट असलेले काम पूर्ण करावे तसेच फुटलेल्या जलवाहिन्या दुरुस्त कराव्यात, कचरा संकलित करण्यासाठी येणा-या घंटा गाडीवरील स्पीकर सुव्यवस्थित ठेवावेत, उघड्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर कारवाई करावी, शहरात विविध ठिकाणची अतिक्रमणे काढण्यात आली आहेत, अशा ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी, रस्त्याचे अर्धवट असलेले काम पूर्ण करावे, रस्त्यांचे काम दर्जेदार होईल याची दक्षता घ्यावी, पदपथांवरील राडारोडा उचलावा, रस्त्यांच्या बाजूने पथदिवे लावावेत, रस्त्याच्या मध्यभागी आणि पदपथावरील निघालेले पेव्हिंग ब्लॉक तात्काळ बसवावेत, नाल्यांमधून वाहणारे पाणी रस्त्यांवर आल्यामुळे दुर्गंध पसरून आरोग्यास धोका निर्माण होतो आहे, फुटलेल्या मलवाहिन्या लवकर दुरुस्त करावे, अशा सूचना व तक्रारी आज झालेल्या जनसंवाद सभेमध्ये नागरिकांनी मांडल्या.

---

# नूतन कार्यकारिणी व नियुक्तीपत्र वाटप कार्यक्रम

# नागरिकांच्या हितासाठी राष्ट्रवादी अर्बन सेल सज्ज !

## खासदार ॲड. वंदना चव्हाण यांचा विश्वास

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या व त्यांच्या न्याय हक्कासाठी अर्बन सेलच्या माध्यमातून आपण सर्वजण कशाप्रकारे महत्वाची भूमिका बजावून या सेलच्या दहा विभागांच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत संघटनेच्या माध्यमातून नागरिकांसाठी सदैव तत्पर राहून सर्व समावेशक कामगिरी बजावू असा निर्धार राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या राज्यसभा खासदार ॲड. वंदना चव्हाण यांनी व्यक्त केला.**



### कार्यक्रमास यांची होती उपस्थिती...

यावेळी कार्याध्यक्ष फजल शेख, नगरसेवक मयुर कलाटे, युवक अध्यक्ष इम्रान शेख, युवती अध्यक्ष वर्षा जगताप, ओबीसी सेल अध्यक्ष विजय लोखंडे, अर्बन सेल निरिक्षक नितिन जाधव, अर्बन सेल अध्यक्ष दत्तात्रय जगताप, अर्बन सेल महिला अध्यक्षा मनीषा गटकळ, पदवीधर सेल अध्यक्ष माधव पाटील, उपाध्यक्ष धनंजय भालेकर, झोपडपट्टी सेल महिला अध्यक्ष सुनीता अडसूळ, मीरा कुदळे, कामगार सेल कार्याध्यक्ष युवराज पवार, चिंचवड विधानसभा महिला अध्यक्षा संगीता कोकणे, ओबीसी महिला अध्यक्षा सारिका पवार, महिला संघटक पल्लवी पांढरे, सरचिटणीस अभिजीत आल्हाट, सरचिटणीस सुदाम शिंदे, कल्पाना आल्हाट, मेघा पवार इत्यादींसह अनेक नवनियुक्त पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थितीत होते.

सोमवार दिनांक १० ऑक्टोंबर २०२२ रोजी मध्यवर्ती कार्यालय पिंपरी येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अर्बन सेल "नूतन कार्यकारिणी व नियुक्ति पत्र वाटप" अर्बन सेल प्रदेशाध्यक्ष आदरणीय खासदार ॲड. सौ. वंदनाताई चव्हाण यांच्या शुभहस्ते व शहराध्यक्ष श्री. अजितभाऊ दामोदर गव्हाणे, महिला निरीक्षक शितलताई हगवने, तसेच महिला अध्यक्षा प्रा. सौ. कविताताई आल्हाट यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

शहराध्यक्ष अजित गव्हाणे यावेळी म्हणाले की, अर्बन सेल पिंपरी चिंचवड शहराच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये प्रथम क्रमांकाचे काम भविष्यात आम्ही करून दाखवू, असे मत व्यक्त केले.

# वैभवशाली शहराला आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्वव्यापी स्मार्ट सिटी बनवण्याचा ध्यास

## *पिंपरी-चिंचवड महापालिका स्थापना दिनानिमित्त प्रशासक व आयुक्त शेखर सिंह यांचे मनोगत...*



विशेष संपादकीय

(भाग-1)

**नमस्ते....!**

**औद्योगिक नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पिंपरी चिंचवड शहराने विकासाच्या दिशेने झेप घेतली आहे. 'कटिबद्धा जनहिताय' हे ब्रीदवाक्य असलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने लोकसहभागातून या नगरीला वैभव प्राप्त करून दिले आहेत. यामध्ये मोलाचा वाटा असलेल्या शहरातील कष्टकरी, कामगार, लोकप्रतिनिधी, खेळाडू, शिक्षक, व्यापारी, पोलिस, सैनिक, डॉक्टर, अभियंते, कलाकार, शास्त्रज्ञ, उद्योजक, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, माध्यम प्रतिनिधी, विविध शासकीय, निमशासकीय यंत्रणा, आस्थापना, स्वयंसेवी संस्था आणि तसेच महापालिका अधिकारी कर्मचारी अशा सर्वांच्या त्यागातून, परिश्रमातून आणि योगदानातून आजची पिंपरी चिंचवड नगरी घडली आहे, या सर्वांप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो.**

शहरामध्ये विविध क्षेत्रांत दिवसेंदिवस आमुलाग्र बदल घडत आहेत. महापालिकेच्या प्रत्येक उपक्रमांत असलेला सर्वांचा सहभाग यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. नागरिकांना उत्तम आणि दर्जेदार पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेची यंत्रणा अविरत काम करीत आहे. पिंपरी चिंचवड शहराला गौरवशाली इतिहास आणि संतांची परंपरा लाभलेली आहे. ही परंपरा अबाधित ठेवून शहराला स्वच्छ व सुंदर तसेच देशातील राहण्यायोग्य सर्वोत्तम शहर बनविण्यासाठी महापालिकेची वाटचाल यशस्वी ठरत आहे. नुकतेच स्वच्छ सर्वेक्षण २०२२ उपक्रमांतर्गत 'सिटीझन फीडबॅक' (सर्वोत्तम नागरिक अभिप्राय) मध्ये पिंपरी चिंचवड शहराला देशात प्रथम क्रमांकाने गौरविण्यात आले.

अल्पावधीत विकासाकडे उत्तुंग भरारी घेतलेल्या पिंपरी चिंचवड शहराच्या भविष्याचा वेध घेत महापालिकेच्या वतीने विविध विकासात्मक प्रकल्प साकारले जात आहेत. महापालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये महापालिकेच्या वतीने नवीन थेरगाव रुग्णालय, नवीन भोसरी रुग्णालय, जिजामाता रुग्णालय, आकुर्डी रुग्णालयांसारखी नवीन रुग्णालये उभारण्यात आली असून ती २४ तास अद्ययावत सेवा देण्यासाठी कार्यरत आहेत. महापालिका क्षेत्रातील किडनीच्या आजारांनी त्रस्त गरजू आणि गरीब रुग्णांकरिता नवीन थेरगाव रुग्णालय येथे डायलेसीस केंद्र सुरु करण्यात येणार आहे. त्याचबरोबर याठिकाणी शिशु अतिदक्षता विभाग देखील सुरु करण्यात येणार असून गरजू तसेच रुग्णालयात जन्मलेल्या आणि अतिदक्षता विभागातील आवश्यकता असलेल्या नवजात शिशूंना रुग्णालयातच उपचार मिळावेत यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. नागरिकांना घराजवळ प्राथमिक उपचार मिळावेत या उद्देशाने शहरात सुसज्ज असे जिजाऊ क्लिनिक सुरु करण्यात येणार आहे. शहर ॲनिमिया मुक्त करण्यासाठी महापालिकेने सुरु केलेली 'मिशन अक्षय' योजना अतिशय परिणामकारक ठरत आहे.

रावेत येथील अशुद्ध जलउपसा केंद्राची क्षमता ४८५ एमएलडी आहे या केंद्रासह निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता १०० दशलक्ष लीटरने वाढविण्यासाठी प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहराच्या लोकसंख्या वाढीचा दर, विकासाचा वेग आणि



भविष्यातील सन २०३१ पर्यंतची शहराची लोकसंख्या विचारात घेता आंद्रा आणि भामा आसखेड धरणातील पाणी आणण्याची योजना राबविण्यात आली आहे. आंद्रा पाणीपुरवठा योजनेमध्ये चिखली येथे जलशुद्धीकरण केंद्र बांधणे, चिखली येथील नवीन जलशुद्धीकरण केंद्र ते देहूपर्यंत रायझिंग मेन टाकणे, निघोजे-तळवडे येथे अशुद्ध जलउपसा केंद्र बांधणे ही कामे सुरु आहेत. यामुळे शहरामध्ये नियमित व उच्च दाबाने पाणीपुरवठा करण्यास मदत होणार आहे.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत प्रशासकीय सेवा सुविधा अधिक गतिमान करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. त्यातून नागरिकांना सहज आणि सुलभ सुविधा उपलब्ध व्हाव्यात हा मुख्य उद्देश आहे. नागरी सहभाग अधिक वाढावा यासाठी महापालिकेच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या सारथी प्रणालीला अधिक गतिमान करण्यासाठी आम्ही कटिबध्द आहोत. नागरी सहभाग अधिक वाढावा यासाठी महापालिकेच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या सारथी प्रणालीला अधिक गतिमान करण्यासाठी आम्ही कटिबध्द आहोत. तसेच नागरी संवादासाठी चॅट बॉट प्रणाली सुरु करणारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका राज्यातील दुसरी महापालिका आहे. व्हॉटस्अप या माध्यमातून नागरिक आपल्या समस्या तसेच सूचना महापालिकेला थेट कळवू लागले आहेत. कॅशलेस व्यवहार करण्यासाठी ग्रीन मार्शल पथकाला हॅण्ड हेल्ड डिव्हाईस देण्यात आले आहेत. यामुळे व्यवहारामध्ये पारदर्शकता आणि सुसूत्रता आली आहे. महापालिकेच्या वतीने आता ऑनलाईन पद्धतीने कर भरण्याची सुविधा देण्यात आली आहे. माझी मिळकत माझी आकारणी या उपक्रमाद्वारे नागरिकांना ऑनलाईन पद्धतीने त्यांच्या नवीन मालमत्तेचा संभाव्य मालमत्ता कर जाणून घेऊन नोंदणी व मालमत्ताकर भरण्याची सुविधा देण्यात आली आहे. यामुळे मालमत्तेची नोंद करण्यासाठी नागरिकांना कार्यालयात यावे लागत नाही. थकबाकी नसल्याचा दाखला देण्याची ऑनलाईन सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे नागरिकांच्या वेळेची बचत होत आहे.

विकासाची गती साधताना समाजातील सर्व घटकांना, विशेषतः उपेक्षित समुहांना विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी महापालिकेने विविध योजना तसेच सर्वसमावेशक धोरणांचा अवलंब करण्याचा प्रयत्न केला आहे. तृतीयपंथी समूहाला स्वावलंबी बनविण्यासाठी महापालिकेने विविध उपक्रम आणि योजना सुरु केल्या आहेत. शिवाय ग्रीन मार्शल, शलाका कर संकलन पथक, रिव्हर मार्शल स्कॉड, सुरक्षापथक अशा विविध पथकात तृतीयपंथीय घटकांची नेमणूक करण्यात आली आहे. या समूहासाठी अशा महत्वाकांक्षी योजना आणि उपक्रम राबविणारी पिंपरी महानगरपालिका देशातील पहिली महापालिका ठरली आहे. या उपक्रमामुळे तृतीयपंथीयांना समाजामध्ये सन्मानाने जगण्यास प्रोत्साहन मिळत आहे.

महापालिकेच्या वतीने महिलांचे सक्षमीकरण आणि सबलीकरण करण्यासाठी महिला बचतगटांना 'नवी दिशा' उपक्रमांतर्गत काम दिले जात आहे. हा उपक्रम खऱ्या अर्थाने प्रेरणेची दिशा दाखविणारा असून यातून बचतगटांना रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे. महापालिकेचे विविध उपक्रम, योजना आणि कार्यक्रम यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तसेच उद्योग समूह आणि कामगार यांचा या कामात सहभाग वाढविण्यासाठी सी.एस.आर. सेल सुरु करण्यात आले आहे. याद्वारे प्राप्त होणाऱ्या निधीतून शहराच्या विकासात हातभार लावला जात आहे. उद्योग सुविधा कक्षाच्या माध्यमातून शहरातील व्यापार आणि उद्योगांची वाढ सुलभ करण्याकरिता तसेच औद्योगिक प्रतिनिधीत्वाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि महापालिकेच्या उपक्रमांत उद्योजकांचा सहभाग वाढविण्यासाठी मदत होत आहे.

औद्योगिक आस्थापनांना कुशल मनुष्यबळाची गरज असते. असे मनुष्यबळ सहज उपलब्ध व्हावे तसेच युवकांना रोजगार आणि स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उत्पादनाभिमुख ट्रेडसचे प्रशिक्षण देण्याचे काम अविरतपणे सुरु आहे. महापालिकेच्या शाळांमध्ये इंग्रजी अध्ययन समृद्धी कार्यक्रम, मिशन शिष्यवृत्ती, शिक्षक सक्षमीकरण असे उपक्रम राबविण्यात येत असून अध्यापनात विविध आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची आवड निर्माण करण्यात येत आहे. तसेच विविध उपक्रमांद्वारे मुलांचा सर्वांगीण विकास कसा साधता येईल यासाठी महापालिकेचे प्रयत्न सुरु आहेत. महापालिकेच्या वतीने संत साहित्य तसेच संगीत शिक्षण देण्यासाठी चिखली येथे 'संतपीठ' विकसित करण्यात आले आहे. यामुळे आपल्या मातीत घडलेल्या संतांची ओळख होऊन विद्यार्थ्यांच्या मनात साहित्याप्रती आदर वृद्धिंगत होण्यास मदत होत आहे. या शहराची जडणघडण करताना पारंपरिक संस्कृती जतन करत सांस्कृतिक, क्रीडा, कला, साहित्य परंपरा अधिक वृद्धींगत होण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सातत्याने प्रयत्न करीत आहे.

नेहरूनगर येथे भटक्या तसेच पाळीव प्राण्यांसाठी उपचार व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ॲनिमल शेल्टर हाऊस सुरु करण्यात आले आहे. याठिकाणी अनेक भटक्या श्वानांवर उपचार केले जातात. नुकतेच महापालिकेच्या वतीने भटकी कुत्री आणि मांजरांसाठी लसीकरण मोहीम राबविण्यात आली होती.

**(भाग-2 (उद्याच्या अंकात)**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## ठरलं! ठाकरे गटाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, तर शिंदे गटाला बाळासाहेबांची शिवसेना हे नाव

# मशाली अन्यायाविरुद्ध पेटवा : शिंदे

### निवडणूक आयोगाने शिंदे गटाला चिन्हासाठी तीन पर्याय देण्यास सांगितले

**। मुंबई । महाईन्यूज ।**

**निवडणूक आयोगाकडून शिंदे गट आणि उद्धव ठाकरे गटाला नवीन नावे बहाल करण्यात आली आहेत. उद्धव ठाकरे गटाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे नाव देण्यात आले असून, धगधगती मशाल हे चिन्ह मिळाले आहे. तर शिंदे गटाला बाळासाहेबांची शिवसेना हे नाव मिळाले असून, चिन्हासाठी निवडणूक आयोगाने तीन पर्याय देण्यास सांगितले आहे.**



विशेष म्हणजे केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह गोठवण्याचा निर्णय घेत शिवसेना हे नाव वापरण्यावर तात्पुरती बंदी घातली होती. यानंतर अंधेरी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने त्रिशूळ, उगवता सूर्य आणि मशाल या तीन चिन्हांचा पर्याय निवडणूक आयोगाकडे पाठवला होता. तर शिंदे गटाने आज त्रिशूळ, गदा आणि उगवता सूर्य ही चिन्ह निवडणूक आयोगाकडे पाठवली होती. मात्र निवडणूक आयोगाने आता 'त्रिशूळ' आणि 'गदा' चिन्ह बाद करत दोन्ही गटाला पुन्हा मोठा धक्का दिला आहे. धार्मिक चिन्ह असल्याचे म्हणत आयोगानं ही दोन्ही चिन्ह नाकारली आहेत. उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे या दोन्ही गटांच्या वतीने सोमवारी निवडणूक आयोगामध्ये चिन्ह आणि नावासाठी कागदपत्र जमा केली होती. त्यावर निवडणूक आयोगाने रात्री उशिरा हा निर्णय दिला. अर्थात हा निर्णय अंधेरी पूर्व विधानसभा निवडणुकीसाठी लागू आहे. दोन्ही गटांच्या नावातील दुसरा पर्याय निवडणूक आयोगाने मान्य केला आहे. उद्धव ठाकरे यांनी त्रिशूळ या चिन्हाची मागणी केली होती. मात्र, त्रिशूळ हे धार्मिक चिन्ह असल्याने हे देता येत नाही. तसेच उगवता सूर्य हे तामिळनाडूतील पक्षाचे निवडणूक चिन्ह असल्याने हे चिन्हही देता येणार नाही, असे आयोगाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे. त्यामुळे तिसरा पर्याय म्हणून उद्धव ठाकरे गटाला मशाल हे चिन्ह देण्यात आले.

शिंदे गटाने उगवता सूर्य, त्रिशूळ आणि गदा या चिन्हांचा पर्याय दिला होता. पहिल्या दोन चिन्हांबाबत निवडणूक आयोगाने आधीच भूमिका स्पष्ट केली. तर गदा हे चिन्ह धार्मिक चिन्ह असल्याने ते देता येणार नाही, असे सांगत शिंदे गटाने तीन नव्या चिन्हांचा पर्याय आज मंगळवारी सकाळपर्यंत द्यावा, असा आदेश दिला आहे.

निवडणूक आयोगाच्या या निर्णयावर शिवसेना नेते भास्कर जाधव यांनी पहिल्याच राजकीय डावपेचामध्ये उद्धव ठाकरे जिंकल्याचे सांगितले. आम्हाला मिळालेल्या नावात यामध्ये बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे आणि शिवसेना या तिन्ही नावांचा समावेश आहे, असेही ते म्हणाले. शिवसेनेकडून आयोगाने दिलेल्या नाव आणि पक्षचिन्हाचे स्वागत करण्यात आले आहे. यानंतर निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरे गटाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे नाव देत 'मशाल' हे चिन्ह बहाल केले आहेत. तर शिंदे गटाला चिन्हासाठी तीन पर्याय देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यात शिंदे गटाला नावांच्या तीन पर्यायांपैकी 'बाळासाहेबांची शिवसेना' हे नाव वापरण्यास निवडणूक आयोगाने परवानगी दिली आहे तर ठाकरे गटाला 'शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे' हे नाव वापरण्यास परवानगी दिली आहे.

#### ▶▶| आमचा पक्ष अन्याय दूर करणारा ; एकनाथ शिंदे

मी सर्व पक्षाच्या कार्यकर्त्यांना शुभेच्छा देतोय. चिन्ह जे आहे ते उद्या दिले जातील, आम्ही जी चिन्हं दिली होती, ती चिन्हं रद्द केली असली तरीसुद्धा उद्या सकाळी दिली जातील, त्यातील एक चिन्ह आम्हाला मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केलाय. मशाली अन्यायाविरुद्ध पेटल्या पाहिजेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात देखील अन्यायाविरुद्ध मशाली पेटवल्या जात होत्या. त्या पाहिल्या होत्या. त्यामुळे आमचा अन्याय दूर करणारा पक्ष आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगानं ठाकरे गटाला मशाल हे चिन्ह दिलं आहे, त्यासंदर्भात त्यांना पत्रकारांशी विचारले असता ते बोलत होते.

#### ▶▶| आम्हीच बाळासाहेबांच्या विचारांचे वारसदार

केंद्रीय निवडणुक आयोगाने आज शिंदे गट आणि उद्धव ठाकरे गटाला दोन वेगवेगळी नावं दिली आहेत. यात निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरे गटाला मशाल हे निवडणूक चिन्ह वापरण्यास परवानगी दिली आहे. तर शिंदे गटाकडून सादर केलेली चिन्ह निवडणूक आयोगाने नाकारत त्यांना 11 ऑक्टोबर रोजी सकाळी 10 वाजेपर्यंत नवे चिन्ह देण्याचे निर्देश दिले आहेत. यात उद्धव ठाकरे गटाला 'शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे' असे नाव मिळाले आहे तर शिंदे गटाला 'बाळासाहेबांची शिवसेना; असे नाव देण्यास परवानगी दिली आहे. दरम्यान निवडणूक आयोगाच्या या निर्णयानंतर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हिंदुत्ववादी विचारांचा अखेर विजय झाल्याचे म्हणत आम्हीच बाळासाहेबांच्या विचारांचे वारसदार... असल्याचा दावा केला आहे.

---

# रयत शिक्षण संस्थेच्या उपक्रमशील शाळा पुरस्काराने श्री. धुंदीबाबा विद्यालयास गौरविले

### संस्थेचे चेअरमन मा. डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण

**। मेढा (ता. जावली) ।**
**महाईन्यूज । चित्रा शिंदे-गुजर**

**रयत शिक्षण संस्थेच्यावतीने देण्यात येणाऱ्या उपक्रमशील शाळा पुरस्काराने यावर्षी जावली तालुक्यातील सोनगाव विद्यानगर येथील श्री. धुंदीबाबा विद्यालयास गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास करण्याच्यादृष्टीने रयत शिक्षण संस्था आणि शाखा स्तरावर विविध नाविन्पूर्ण उपक्रम राबविले जातात.**



**रयत शिक्षण संस्थेच्या श्री. धुंदीबाबा विद्यालय विद्यानगर या विद्यालयास सन 2021-22 या शैक्षणिक वर्षाचा उपक्रमशील शाळा हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.या नाविन्पूर्ण उपक्रमांची दखल घेऊन संस्थेच्यावतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री. धुंदीबाबा विद्यालय विद्यानगर या विद्यालयास सन 2021-22 या शैक्षणिक वर्षाचा उपक्रमशील शाळा हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.या नाविन्पूर्ण उपक्रमांची दखल घेऊन संस्थेच्यावतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल परिसरातून शिक्षक वृंद, शिक्षिकेत्तर स्टाफ तसेच विद्यार्थी-पालक यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. सदर पुरस्काराचे वितरण रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. डॉ. अनिल पाटील, मा. आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. सदर पुरस्काराचा स्वीकार विद्यालयाचे मुख्याध्यापक जाधव टी.बी. सर, उपशिक्षक लांडे एस. ई. सर यांनी केला.

#### संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त पुरस्कार प्रदान

श्री. धुंदीबाबा विद्यालय विद्यानगर या विद्यालयाने विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याच्या हेतूने वर्षभर विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांची दखल घेऊन रयत शिक्षण संस्थेने घेत 4 ऑक्टो. 2022 रोजी संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त उपक्रमशिल शाळा हा पुरस्कार विद्यालयास प्रदान करण्यात आला.

#### गुरुकुल पालक संघाच्यावतीने अभिनंदन

विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांचे अभिनंदन केले. व पुढील वाटचालीस व सर्व सदस्य, तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संतोष शिंदे व सर्व सदस्य व गुरुकुल पालक संघाचे अध्यक्ष जाधव टी.बी. तसेच सर्व सदस्य यांच्यावतीने सर्वांचे अभिनंदन केले.

# “दुसरे भाषायुद्ध लादू नका”!

## हिंदी भाषेला अधिकृत दर्जा देण्याबाबत तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन आक्रमक

। राजस्थान ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

संसदेच्या भाषा समितीने अलीकडेच, केंद्र सरकारकडून चालवण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये इंग्रजीऐवजी हिंदी किंवा स्थानिक भाषांमधून शिक्षण दिलं पाहिजे. तसेच हिंदी भाषेला भारताची अधिकृत भाषा म्हणून संयुक्त राष्ट्रांत मान्यता मिळावी, असं कथितपणे म्हटलं आहे. यानंतर तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. देशात केवळ हिंदी भाषिकांना भारतीय नागरिकाचा दर्जा देणं आणि इतरांना द्वितीय श्रेणीचे नागरिक गृहीत धरणं म्हणजे ‘फोडा आणि राज्य करा’ ही नीति आहे, अशी टीका तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी केली आहे.

आमच्यावर दुसरं भाषायुद्ध लादू नका. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास लक्षात घेता सरकारने घटनेच्या आठव्या अनुसूचीतील सर्व भाषांना अधिकृत भाषा मानायला



हवे, असंही स्टॅलिन म्हणाले. भारतीय संविधानाच्या अनुसूची ८ मध्ये हिंदी, तमिळ आणि इंग्रजीसह २२ भाषांना अधिकृत भाषेची मान्यता देण्यात आली आहे. विशेष म्हणजे स्टॅलिन यांचे वडील एम करुणानिधी हे जेव्हा डीएमके पक्षाचं नेतृत्व करत होते. तेव्हापासून ते हिंदी भाषेला अधिकृत भाषेचा दर्जा देण्याच्या विरोधात होते. त्यांनी ५० वर्षांहून अधिक काळ हिंदी भाषा लादण्याला विरोध केला आहे. आपली शेजारील राज्येदेखील हिंदी भाषेला अधिकृत भाषा म्हणून स्वीकारणार नाहीत, असंही स्टॅलिन म्हणाले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे संसदेच्या अधिकृत भाषा समितीचे अध्यक्ष आहेत. त्यांनी अलीकडेच हिंदी भाषेला अधिकृत भाषेचा दर्जा देण्याबाबत आढावा बैठक घेतली.

आमच्यावर दुसरं भाषायुद्ध लादू नका. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास लक्षात घेता सरकारने घटनेच्या आठव्या अनुसूचीतील सर्व भाषांना अधिकृत भाषा मानायला हवे, असंही स्टॅलिन म्हणाले. भारतीय संविधानाच्या अनुसूची ८ मध्ये हिंदी, तमिळ आणि इंग्रजीसह २२ भाषांना अधिकृत भाषेची मान्यता देण्यात आली आहे. विशेष म्हणजे स्टॅलिन यांचे वडील एम करुणानिधी हे जेव्हा डीएमके पक्षाचं नेतृत्व करत होते. तेव्हापासून ते हिंदी भाषेला अधिकृत भाषेचा दर्जा देण्याच्या विरोधात होते. त्यांनी ५० वर्षांहून अधिक काळ हिंदी भाषा लादण्याला विरोध केला आहे. आपली शेजारील राज्येदेखील हिंदी भाषेला अधिकृत भाषा म्हणून स्वीकारणार नाहीत, असंही स्टॅलिन म्हणाले.

गेल्या महिन्यात याबाबतचा एक अद्ययावत अहवाल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सादर केला आहे. सर्व राज्यांमध्ये इंग्रजीऐवजी स्थानिक भाषांना प्राधान्य देण्याची शिफारस संबंधित अहवालात केली आहे. या समितीने हिंदी वापराच्या आधारावर राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांची तीन गटांमध्ये विभागणी केली.

‘अ’ गटातील राज्यांनी सर्वत्र हिंदी भाषा १०० टक्के वापरावी, अशी इच्छा संबंधित समितीची आहे. यामध्ये यूपी, बिहार, मध्य प्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड, झारखंड, हरियाणा, हिमाचल प्रदेश, राजस्थान, दिल्ली आणि अंदमान निकोबार बेटे आहेत. तर पंतप्रधान मोदींचे गृहराज्य गुजरात, महाराष्ट्र, पंजाब या राज्यांसह चंदीगड, दमण आणि दीव आणि दादरा आणि नगर हवेली हे केंद्र शासित प्रदेश ‘ब’ श्रेणीत आहेत. तसेच दक्षिणेकडील राज्यांसह उर्वरित भारत ‘क’ गटात समाविष्ट करण्यात आला आहे. आता हा अहवाल स्वीकारायचा की नाही हे राष्ट्रपतींवर अवलंबून आहे.

### बंगालमधल्या हिंसाचारामागे ‘अल कायदा’,

# ‘आयसिस’हात; भाजपाचा आरोप

## केंद्रीय गृहमंत्री आणि राज्यपालांना पाठवले पत्र

। जयपूर ।महाईन्यूज ।

पश्चिम बंगालमधील कोलकाता येथे मोमिनपूर भागात झालेल्या हिंसाचारामागे ‘अल कायदा’, ‘आयसिस’चा हात असल्याचा आरोप भाजपाकडून करण्यात आला आहे. बंगालचे विधानसभा विरोधी पक्षनेते सुवेंदु अधिकारी यांनी पत्रकारपरिषदेत हा आरोप केला आहे. याशिवाय या हिंसाचारामुळे कोलकातामधून जवळपास ५ हजार हिंदू पळून गेले असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

याशिवाय सुवेंदु अधिकारींनी कोलकाता पोलीस आयुक्तांना आव्हान देत म्हटले आहे की, किमान तुमचे तीन अधिकारी या घटनेत जखमी झालेले आहेत. याशिवाय तीन आयपीएस अधिकारी रुग्णालयात आहेत. सुवेंदु अधिकारींनी म्हटले की, तुम्ही भाजपा



नेत्यांना परिसरात येण्यापासून रोखले आहे आणि इंटरनेटवर निर्बंध आणले आहेत. तुम्ही आमच्या प्रदेशाध्यक्षांनाही अटक केली आहे. आम्ही आमच्या हातात हिंसाचाराची छायाचित्रे धरली आहेत. आता तुम्ही समजू शकता की तुम्ही मुख्यमंत्री म्हणून कोणाला निवडलं आहे. त्यांनी जाळपोळ आणि तोडफोड केली आहे. बंगाली हिंदूंनी यापुढे स्थलांतर करू नये, अशी आमची इच्छा आहे. आम्ही मोमिनपूर हिंसाचाराबाबत बंगालचे राज्यपाल आणि केंद्रीय गृहमंत्र्यांना पत्र लिहिले आहे.

### भाजपाने तीन मागण्या केल्या आहेत

भाजपाने या पत्राद्वारे तीन प्रमुख मागण्या केल्या आहेत. या भागात सीआरपीएफचे जवान तातडीने तैनात करण्यात यावेत. पीडितांना राज्य सरकारने तातडीने नुकसान भरपाई द्यावी आणि या हिंसाचाराचे व्हिडिओ फुटेज तपासावे पाहिजे व दोषींना अटक करून कठोर आरोप लावले जावेत. अशीही माहिती सुवेंदु अधिकारींनी दिली आहे.


# गायीला राष्ट्रीय प्राणी घोषित करणं आमचं काम आहे का?

## गायीला राष्ट्रीय प्राणी घोषित करण्यासाठी याचिका दाखल

। बर्लिन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

गायीला राष्ट्रीय प्राणी जाहीर करण्याच्या याचिकेवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. या याचिकेमध्ये गायींचं संरक्षण करण्याची मागणीही करण्यात आली होती. न्यायमूर्ती एस. एस. कौल आणि न्यायमूर्ती अभय ओक यांच्या खंडपीठासमोर याचिकाकर्त्यांना याचिका मागे घेण्याची परवानगी दिली आहे.

याचिकाकार्त्यांच्या वकिलांनी भारत सरकारसाठी गायींची सुरक्षा हा फार महत्त्वाचा विषय असल्याचा युक्तीवाद केला. यावर न्यायालयाने, “एखाद्या प्राण्याला राष्ट्रीय प्राणी जाहीर करणं हे न्यायालयाचं काम आहे का? अशा याचिका तुम्ही का दाखल करता त्यावर आम्हाला दंड ठोठावण्याशीवाय इतर पर्याय उतरत



नाही,” असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकार्त्यांना विचारला.

लाइव्ह लॉ’ने दिलेल्या वृत्तानुसार न्यायालयाच्या या प्रतिक्रियेवर याचिकार्त्यांच्या वकिलांनी, “तुम्ही केवळ केंद्र सरकारला यासंदर्भात विचार करण्याचे निर्देश द्यावेत अशी मागणी करत आहोत,” असं उत्तर दिलं. यावर खंडपीठाने, “कोणाच्या मूलभूत अधिकारांचं उल्लंघन झालं आहे की ज्यासाठी तुम्ही अनुच्छेद ३२ अंतर्गत याचिका दाखल केली आहे. तुम्ही लोक अशा याचिका का दाखल करता?” असा प्रश्न विचारला. खंडपीठाला आपला मुद्दा पटवून सांगताना याचिकाकार्त्यांच्या वकिलाने गाय आपल्याला जीवनामध्ये फार मदत करते असं विधान केलं..

# रशियाने युक्रेनवर डागले ७५ क्षेपणास्त्र

## पाच जणांचा मृत्यू, घटनेचा भीषण व्हिडीओ आला समोर

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

युक्रेन आणि रशियामधील संघर्ष दिवसेंदिवस वाढत चालला आहे. रशियाने युक्रेनच्या अनेक शहरांवर ७५ क्षेपणास्त्र डागले आहेत. क्रिमिया आणि रशियामधील पुलावर स्फोट घडवल्याच्या रशियाच्या आरोपानंतर आज हा क्षेपणास्त्र हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. शांतताप्रिय लोकांवर केलेला हा निर्दयी हल्ला आहे, अशी प्रतिक्रिया युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी दिली आहे. या हल्ल्यानंतर घरातून बाहेर न पडण्याचे आवाहन नागरिकांना झेलेन्स्की यांनी केले आहे. त्यांना आम्हाला पृथ्वीवरूनच पुसून टाकायचे आहे, असे म्हणत झेलेन्स्की यांनी रशियाला सुनावले आहे. शहरातील अनेक शहरांमध्ये हा हल्ला करण्यात आल्याची माहिती युक्रेनच्या अध्यक्षांच्या कार्यालयाचे उपप्रमुख कायरेलो त्मोशेन्को यांनी दिली आहे. शहरातील नागरिकांनी सुरक्षित स्थळी आश्रय घेण्याचे आव्हान सोशल मीडियावरुन त्मोशेन्को यांनी केले आहे. स्थानिक वेळेनुसार किव्हमध्ये सकाळी ८ वाजून १५ मिनिटांनी क्षेपणास्त्र हल्ला झाला आहे. यानंतर शहरात गोंधळ निर्माण झाला असून नागरिकांमध्ये घबराटीचं वातावरण आहे. सोमवारी सकाळी किव्हमध्ये पाच स्फोट झाले आहेत. शेवचेन्किवस्क्यी जिल्ह्यामध्ये काही स्फोट झाल्याची माहिती किव्ह शहराचे महापौर विताली क्लित्स्चको यांनी सोशल मीडियावरुन दिली आहे. रशियाने रविवारीही युक्रेनवर क्षेपणास्त्र डागले होते. या हल्ल्यात लहान मुलासह १३ जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर आज पुन्हा रशियाने युक्रेनवर क्षेपणास्त्र डागले आहे.




**या हल्ल्यानंतर घरातून बाहेर न पडण्याचे आवाहन नागरिकांना झेलेन्स्की यांनी केले आहे. त्यांना आम्हाला पृथ्वीवरूनच पुसून टाकायचे आहे, असे म्हणत झेलेन्स्की यांनी रशियाला सुनावले आहे. शहरातील अनेक शहरांमध्ये हा हल्ला करण्यात आल्याची माहिती युक्रेनच्या अध्यक्षांच्या कार्यालयाचे उपप्रमुख कायरेलो त्मोशेन्को यांनी दिली आहे. शहरातील नागरिकांनी सुरक्षित स्थळी आश्रय घेण्याचे आव्हान सोशल मीडियावरुन त्मोशेन्को यांनी केले आहे.**

# आलिया भट्टला लागले पाणीपुरी खाण्याचे डोहाळे,



बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्ट लवकरच आई होणार आहे. अभिनेता रणबीर कपूरशी एप्रिल २०२२मध्ये लग्नगाठ बांधल्यानंतर काही महिन्यांतच तिने ही गुडन्यूज चाहत्यांना दिली. कपूर कुटुंबीय नव्या पाहुण्याची जय्यत तयारी करत आहेत. गरोदरपणात महिलांना डोहाळे लागतात. तसेच डोहाळे आलियालाही लागले आहेत. आलियाला पाणीपुरी खाण्याची इच्छा झाली. आलियाने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये काही फोटो शेअर केले होते. मोठी बहीण शाहीन भट्टसह आलियाने रविवारचा दिवस घालवला. यावेळी तिने शाहीनबरोबर चाट खाण्याचा आनंद घेतला. याचे फोटो तिने इन्स्टाग्रामवरून शेअर केले होते. या फोटोला तिने 'पावर ऑफ पुरी' असं कॅप्शन दिलं होतं. दुसऱ्या स्टोरीमध्ये आलियाने शेवपुरीचा फोटो शेअर केला होता.

# अभिनेत्री होण्याआधी सोसले हाल, वडिलांचा करायच्या तिरस्कार



बेधुंद करणारी नजर आणि घायाळ करणाऱ्या अदाकारीने जिनं लाखो चाहत्यांना वेड लावलं ती अभिनेत्री म्हणजे रेखा. रेखा यांचा आज वाढदिवस आहे. त्या 68 वर्षांच्या झाल्या आहेत. वयाचा आकडा वाढला असला तरी त्यांच्या चेहऱ्यावरची चमक आजही तरुण अभिनेत्रींना लाजवेल अशीच आहे. रेखा म्हणजे हिंदी सेनेसृष्टीतील एकेकाळी कायमच चर्चेत असलेलं नाव. बड्या बड्या अभिनेत्रींना देखील त्यांच्याबद्दल ईर्षा वाटायची. रेखा या प्रेमसंबंध तसंच त्यांचं खासगी आयुष्य अशा अनेक कारणांमुळे कायम चर्चेत राहिल्या. रेखा यांच्या वाढदिवसानिमित्ताने आपण त्या अभिनेत्री होण्याआधीच्या काही खास गोष्टी जाणून घेणार आहोत. अभिनय क्षेत्रात येण्यापूर्वी रेखा यांनी आयुष्यात अनेक चढ-उतार पाहिले आहेत.त्यांना अनेक अडचणींचा सामना देखील करावा लागलाय. रेखा यांच्या आई कर्जबाजारी झाल्या होत्या. त्यांच्यावर खूप मोठ कर्ज होतं त्यामुळे अगदी कमी वयातच रेखा यांना काम करावं लागलं होतं. रेखा आपल्या वडिलांचा खूप तिरस्कार करायच्या. यामागचं कारण म्हणजे त्यांच्या वडिलांनी रेखा यांना कधीच मुलगी म्हणून स्वीकारलं नव्हतं. खरं तर रेखा यांचे वडील तामिळ सेनेसृष्टीतील सुपरस्टार होते. तर त्यांच्या आई देखील तामिळ इंडस्ट्रीमध्ये अभिनेत्री होत्या. असं म्हटलं जातं की रेखा यांचा जन्म झाला तेव्हा त्यांच्या आई-वडिलांचं लग्न झालं नव्हतं. किंबहुना त्यांनी कधी लग्नच केलं नाही. रेखा यांच्या वडिलांनी चार विवाह केले होते मात्र त्यांनी रेखा यांच्या आईशी विवाह केला नव्हता. तसंच रेखा माझं रक्त नाही असं म्हणत त्यांनी कधीच मुलगी म्हणून रेखा यांचा स्वीकार केला नाही. म्हणूनच रेखा वडिलांचा तिरस्कार करायच्या. एवढंच काय तर त्या वडिलांच्या अंत्यदर्शनासाठीही त्या गेल्या नव्हत्या. लहानपणीपासूनच रेखा यांना अभिनेत्री होण्याची इच्छा होती. ज्यावेळी रेखा त्यांच्या मैत्रिणींमध्ये अभिनेत्री होण्याच्या इच्छेबद्दल सांगत त्यावेळी मैत्रिणी त्यांची थट्टा करत.

# अनेक वर्ष मोठ्या पडद्यापासून का दूर होत्या वर्षा उसगांवकर?

अनेक वर्ष आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक म्हणजे वर्षा उसगांवकर. उत्तमोत्तम चित्रपट, नाटकं आणि मालिकांमध्ये काम करत अनेक वर्ष त्यांनी प्रेक्षकांना भुरळ घातली. परंतु गेली काही वर्ष त्या मोठ्या पडद्यावर झळकल्या नाहीत. मधल्या काळात त्या छोट्या पडद्यावर सक्रिय होत्या. परंतु त्या वर्षात त्या चित्रपटात का काम करत नाहीत, असा प्रश्न प्रेक्षकांना पडला होता. अखेर त्यांनी स्वतः याचं कारण उघड केलं आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'हवाहवाई' चित्रपटाच्या निमित्ताने त्यांनी आणि चित्रपटाच्या संपूर्ण टीमने 'लोकसत्ता डिजीटल अड्डा'वर हजेरी लावली आणि मनमोकळ्या गप्पा मारल्या. त्यावेळी बोलताना वर्षा उसगांवकर यांनी चित्रपटसृष्टीपासून दूर राहण्याचं कारण सांगितलं. त्या म्हणाल्या, "चित्रपटात काम करण्याची माझी खूप इच्छा होती, पण कणा असलेल्या भूमिकाच मला विचारण्यात आल्या नाहीत. एक दिवसाची, दोन दिवसाची, दहा दिवसाची भूमिका मला ऑफर होत होत्या." पुढे त्यांनी त्यांना गेल्या काही वर्षात आलेले निर्माता – दिग्दर्शकांचे अनुभवही सांगितले. त्या म्हणाल्या, "एक निर्माता माझ्याकडे एका चित्रपटाची कथा ऐकवायला आला. त्याने कथा ऐकवायला सुरुवात केली. तो म्हणाला, "तुम्ही हिरोच्या आई असता...तुम्ही अमेरिकेहून येता" आणि पुढे तो कथा विसरला. मला आश्चर्य वाटलं. मी अमेरिकेहून भारतात येऊन काय करते, हेच जर दिग्दर्शक विसरत तर मी अशी भूमिका का करायची? काम करण्याच्या समाधानाबरोबरच पैसे मिळवणंही महत्वाचं असलं तरी पैशासाठी मी चित्रपटांच्या कथेच्या बाबतीत तडजोड करणार नाही." दरम्यानच्या काळात त्यांनी जे मराठी चित्रपट केले ते प्रेक्षकांपर्यंत पोहोचले नाहीत.



# "अमित, लव्ह यू..." जिवलग मित्राचे कौतुक करत धर्मेंद्र यांनी केली भावनिक पोस्ट

अमिताभ बच्चन यांचा 'ऊंचाई' हा चित्रपट पुढच्या महिन्यामध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटामधील त्याचा लूक असलेले पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आले. त्यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधन या पोस्टरचे अनावरण करण्यात आले. या चित्रपटामध्ये त्यांच्या व्यतिरिक्त अनुपम खेर आणि बोमन इराणी प्रमुख हे कलाकार भूमिकेमध्ये आहेत. ते या चित्रपटामध्ये 'अमित श्रीवास्तव' हे पात्र साकारणार आहेत. राजश्री फिल्म्सच्या सूरज बरजात्या यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे.

या चित्रपटाबद्दल अभिनेते धर्मेंद्र यांनी एक ट्वीट केले आहे. त्यांनी सोशल मीडियाद्वारे अमिताभ आणि 'ऊंचाई' या चित्रपटाच्या टीमला शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांनी ट्विटरवर 'शोले' चित्रपटातील फोटो शेअर केला आहे. या फोटोच्या कॅप्शनमध्ये त्यांनी अमिताभ यांना



'बॉलिवूडमधील सर्वोत्तम अभिनेता' अशी उपाधी दिली आहे. अमिताभ आणि धर्मेंद्र यांनी बऱ्याच सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. 'शोले' चित्रपटामध्ये त्यांच्यावर चित्रीत झालेले 'ये दोस्ती..' हे गाणं फार

# आमिर खानच्या 'या' सुपरहिट चित्रपटाचा येणार सिक्वेल

गेल्या काही वर्षात अनेक गाजलेल्या चित्रपटांचे सिक्वेल बॉलिवूडमध्ये तयार करण्यात आले. यात 'गोलमाल', 'सिंघम', 'धूम' अशा सुपरहिट चित्रपटांचा समावेश आहे. अशातच आता आणखी एका लोकप्रिय चित्रपटाचा दुसरा भाग येणार आहे. हा चित्रपट म्हणजे आमिर खानचा 'गजनी.' मूळ तमिळमध्ये बनलेल्या 'गजनी' या चित्रपटात सुरिया, असिन आणि नयनतारा मुख्य भूमिकेत होते. तीन वर्षांनंतर, म्हणजेच



२००८ मध्ये या चित्रपटाचे दिग्दर्शक मुर्गदास यांनी या चित्रपटाचा हिंदी रिमेक केला. या हिंदी रिमेकमध्ये आमिर खान आणि असिनसह जिया खान हे कलाकार प्रमुख भूमिकेत होते. शॉर्ट टर्म मेमरी लॉस या आजारावर बेतलेल्या या चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनावर लॉन्ग टर्म गारुड केलं होतं. खुद्द आमिर याच्या प्रमोशनसाठी रस्त्यावर उतरून लोकांना खास गजनी

## शॉर्ट न्यूज »

### हरमनप्रीत कौरची मोठी झेप!

।नवी दिल्ली। महाईन्यूज

भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर आणि पाकिस्तानचा सलामीवीर मोहम्मद रिझवान यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचे बक्षीस मिळाले आहे.



दोन्ही खेळाडूंना आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने त्यांच्या श्रेणीतील महिन्यातील सर्वोत्तम क्रिकेटपटू म्हणून निवडले आहे. महिला गटात हरमनप्रीत महिन्यातील सर्वोत्तम खेळाडू ठरली आहे, तर रिझवानला पुरुष गटात हा बहुमान मिळाला आहे. विराट कोहली, रोहित शर्मासारख्या खेळाडूंना मोह्मद रिझवानशी बरोबरी करता आली नव्हती. पण आता भारताच्या हरमनप्रीत कौरने रिझवानशी बरोबरी केली आहे. हरमनप्रीतच्या नेतृत्वाखाली भारताने इंग्लंडमध्ये इतिहास रचला होता, कारण भारताला १९९९ नंतर एकदाही इंग्लंडमध्ये विजय मिळवता आला नव्हता.

# आशिया चषक क्रिकेट स्पर्धा : भारताचा संघप्रयोगावर भर!

## आज थायलंड महिला संघाशी सामना; युवा खेळाडूंकडे नजरा

**सिल्हेट। महाईन्यूज । वृत्तसंस्था**

उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित करणाऱ्या भारतीय महिला संघाचा सोमवारी आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत थायलंडशी सामना होणार आहे. या सामन्यातही भारतीय संघाचा युवा खेळाडूंना संधी देण्यावर भर असेल.

भारताने या स्पर्धेतील आपल्या सर्व सामन्यांत अंतिम ११ खेळाडूंमध्ये बदल केले आहेत. पुढील वर्षी होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेकडे पाहता ऐरवी सातत्याने सामने खेळण्यास न मिळणाऱ्या खेळाडूंना अधिक संधी देण्याचा भारतीय संघ व्यवस्थापनाचा प्रयत्न आहे. फलंदाजी फळीत सलग बदल केले जात आहे, ज्यामध्ये कर्णधार हरमनप्रीत कौरला पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात सातव्या स्थानावर पाठवण्यात आले. पण संघ व्यवस्थापनाचा हा निर्णय चुकीचा ठरला आणि अन्य फलंदाजांवर दडपण आले. त्यामुळे भारताला पारंपरिक प्रतिस्पर्धी



पाकिस्तानकडून पराभूत व्हावे लागले. भारताच्या शफाली वर्माची लय संघाच्या दृष्टीने सकारात्मक बाब म्हणता येईल. कर्णधार हरमनप्रीतला गेल्या सामन्यात दुखापतीमुळे विश्रांती देण्यात आली होती. जेमिमा रॉड्रिग्जने या स्पर्धेत चुणूक दाखवली असून सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये ती अग्रस्थानी आहे. दीप्ती शर्माने संघासाठी अष्टपैलू कामगिरी केली.

दुसरीकडे, थायलंडने दिमाखदार कामगिरी केली असून त्यांनी गेल्या तीन सामन्यांत विजय नोंदवले. थायलंड सहा गुणांसह गुणतालिकेत चौथ्या स्थानी आहे. यजमान बांगलादेश चार गुणांसह त्यांच्या मागे असून त्यांचा अजून एक सामना शिल्लक आहे. भारतीय संघ आठ गुणांसह अग्रस्थानी आहे. पाकिस्तानवर धक्कादायक विजय मिळवणाऱ्या थायलंडविरुद्ध भारतीय संघाला आता सावधपणे खेळावे लागले.

भारताने या स्पर्धेतील आपल्या सर्व सामन्यांत अंतिम ११ खेळाडूंमध्ये बदल केले आहेत. पुढील वर्षी होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेकडे पाहता ऐरवी सातत्याने सामने खेळण्यास न मिळणाऱ्या खेळाडूंना अधिक संधी देण्याचा भारतीय संघ व्यवस्थापनाचा प्रयत्न आहे. फलंदाजी फळीत सलग बदल केले जात आहे, ज्यामध्ये कर्णधार हरमनप्रीत कौरला पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात सातव्या स्थानावर पाठवण्यात आले. पण संघ व्यवस्थापनाचा हा निर्णय चुकीचा ठरला आणि अन्य फलंदाजांवर दडपण आले. त्यामुळे भारताला पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानकडून पराभूत व्हावे लागले.

# धोनीला रुपेरी पडद्याची भुरळ

## चित्रपटात साकारणार 'ही' भूमिका

**अहमदाबाद । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग माही १५ ऑगस्ट २०२० रोजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला, परंतु तो आयपीएलमध्ये खेळताना दिसत आहे. तो अजूनही चेन्नई संघाचे कर्णधारपद सांभाळत आहे. भारतीय संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीने क्रिकेटमध्ये खूप नाव कमावले आहे. धोनी हा जगातील महान खेळाडूंपैकी एक मानला जातो. टी२० विश्वचषक जिंकणारा महेंदसिंग धोनी हा पहिला कर्णधार आहे. भारताला त्याने क्रिकेटमधील सर्व प्रकारात एका उंचीवर नेऊन ठेवले. आयसीसीचे तीन महत्वाचे चषक त्याने जिंकून दिले आहेत. फलंदाजीला सर्वात खाली येत त्याने फिनिशरची भूमिका निभावली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर असलेल्या टीम इंडियाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीने आता फिल्मी विश्वावर अधिराज्य गाजवण्याची तयारी केली आहे. त्याचा अद्याप हिरो बनण्याचा




कोणताही विचार नसला तरी त्याने स्वतःचे प्रोडक्शन हाऊस सुरू केले आहे. माहीने त्याच्या प्रोडक्शन हाऊसचे नाव 'धोनी एंटरटेनमेंट' ठेवले आहे.

लेट्स सिनेमाने रविवारी ट्विट करून ही माहिती दिली आहे. त्याने एक फोटो देखील शेअर केला ज्यामध्ये धोनी दिसत आहे आणि त्याच्या प्रोडक्शन हाऊसचे नाव देखील आहे. सूत्रांकडून अशी माहिती समोर येत आहे की, धोनी आता फिल्मी दुनियेत लवकरच पाऊल ठेवणार असून तो स्वतःचे प्रोडक्शन हाऊस सुरू करेन. रिपोर्ट्समध्ये असा दावाही करण्यात आला होता की, धोनी साऊथचा सुपरस्टार थलपथी विजयसोबत एक चित्रपट करणार आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजिटल आवृत्ती छपाईसाठी नाही